Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २४४ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.१५ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### मोदानीच्या जमीन घोटाळ्याविरुद्ध संसद व संसदे बाहेरही लढू

**मुंबई–**मुंबईमध्ये मोदानी अँड कंपनीचा महाजमीन घोटाळा जोमात सुरू आहे. मुंबईकरांच्या हक्काच्या मोक्याच्या सार्वजनिक जागा नाममात्र दरावर प्रस्थापित नियमांना आणि प्रक्रियेला बगल देऊन अदानींच्या समूहाला भेट देण्याचा सपाटाच शिंदे सरकारने लावला आहे. धारावी पुनर्वसनाच्या नावाखाली कुर्ला येथील मदर डेअरीसाठी पूर्वी वापरण्यात येणारी शासकीय जमीन याच महाघोटाळ्याचा एक भाग असून या महाघोटाळ्याच्या विरुद्ध संसदेत, विधानसभेत, कोर्टात आणि रस्त्यावर उतरून लढू पण मुंबईकरांची लूट होऊ देणार नाही, असा इशारा मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी दिला आहे.मुंबई प्रदेश काँग्रेसच्या कार्यालयात पत्रकारांशी बोलताना खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या की, अदानीसाठी मुंबईतील भूखंड अत्यंत कमी दराने देण्याचा शिंदे भाजपा सरकारचा निर्णय अत्यंत चुकीचा असून हा एक मोठा जमीन घोटाळा आहे. मदर डेअरीची २१ एकर जमीन अदानीला देताना कोणत्याही प्रक्रियेचे पालन केलेले नाही. जमीन देण्याआधी जाहिरात दिली पाहिजे, कलेक्टर यांनी प्रस्ताव बनवनू तो शासनाला पाठवला पाहिजे व नंतर योग्य त्या प्रक्रिया पार पाडल्या जातात पण या भूखंड हस्तांतरणाप्रकरणी अशी कोणतीही प्रक्रिया झालेली नाही. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही जमीन अदानीला दिल्याचा शासन आदेस १० जूनला जारी केला आहे. अशा प्रकारचा व्यवहार करताना १९७१ च्या कायद्यानुसार होणे अपेक्षित आहे पण अदानी हे पंतप्रधानांचे मित्र असल्याकारणाने बगल देण्यात आली आहे असे गायकवाड म्हणाल्या.

### संभाजीनगरात वस्तू व सेवा कराचे अपिलीय न्यायाधिकरण खंडपीठ तयार करा

संभाजीनगर शहर हे मराठवाडा विभागाचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने तसेच औद्यौगिक, पर्यटन, व्यावसायाच्या अनुषंगाने महत्वपूर्ण ठिकाण असल्यामुळे येथे वस्तू व सेवा कराचे अपिलीय न्यायाधिकरणाचे खंडपीठ (उळीर्लीळीं इशपलह) छत्रपती संभाजीनगर येथे तातडीने व्यवस्थापित करुन कार्यान्वित करण्याबाबत राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी संबंधितांना निर्देश देण्यात यावेत,अशी मागणी विधान परिषद विरोधी पक्षनेते तथा शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.देशातील विविध राज्यांनी जीएसटी कौन्सिलकडे पाठवलेल्या प्रस्तावात ५० न्यायाधिकरण खंडपीठांची स्थापना करण्याची सूचना केली होती. तद्नुषंगाने केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा कर अपीलीय न्यायाधिकरण साठी राज्य खंडपीठांची स्थापना करण्याबाबत अधिसूचना प्रसिध्द केली आहे. वस्तू व सेवा कराच्या राज्य खंडपीठांमुळे करदाते आणि पुरवठादारांना जलदगतीने न्याय मिळणार असून सर्व माननीय उच्च न्यायालयांवरील कामाचा ताण कमी होणार असल्याकडे दानवे यांनी पत्रातून सरकारचे लक्ष वेधले आहे.

### येत्या २४ तासात कोकण आणि विदर्भात पावसाची शक्यता

येत्या २४ तासात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. नैऋत्य मोसमी पाऊस पुढच्या तीन चार दिवसात राज्याच्या आणखी काही भागात दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेने व्यक्त केली आहे.या वर्षीचा उन्हाळा तीव्र होता. मात्र यंदाचा पर्जन्यकाळ समाधानकारक असल्याचे भाकीत वर्तवले गेले आहे. या संपूर्ण हंगामात १०५ टक्के पाऊस पडेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा वेळेआधीच मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे

# वीज ग्राहकांना सरसकट स्मार्ट प्री-पेड वीज मीटर जोडणीची सक्ती रद्द करा-आ.किशोर जोरगेवार

## मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची भेट घेत केली मागणी,सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत, राज्यातील वीज ग्राहकांना सरसकट स्मार्ट प्री-पेड वीज मीटर जोडणीची सक्ती रद्द करण्याची मागणी केली आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले असून, या अधिवेशनात सरकारकडून याबाबत मोठी घोषणा होण्याची शक्यता आहे.

आमदार जोरगेवार यांनी सांगितले की, स्मार्ट प्री-पेड वीज मीटर बाबत जनतेमध्ये रोष आहे. त्यामुळे जनतेला मान्य नसलेल्या या मीटर जोडणीची सक्ती तात्काळ रद्द करण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. आज मुंबई मंत्रालय येथे झालेल्या या भेटीत सकारात्मक चर्चा झाली असून, लवकरच याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहे.

वीज ही सामान्य नागरिकांची प्राथमिक गरज आहे आणि सरकारने ती माफक दरात पुरवणे आवश्यक आहे. अनेक राज्यांमध्ये २०० युनिटपर्यंत वीज मोफत दिली जात असताना, महाराष्ट्रात वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहेत. वीज बिलात समाविष्ट असलेल्या विविध कर आणि शुल्क हे दरवाढीचे प्रमुख घटक आहेत.

शासनाच्या नवीन वीज कर धोरणानुसार सर्व वीज ग्राहकांना स्मार्ट प्री-पेड वीज मीटर जोडण्याची सक्ती करण्यात येत आहे. ग्राहकांच्या घरांमध्ये मोठ्या प्रमाणात स्मार्ट प्री-पेड वीज मीटर लावले जात आहेत.



जुने वीज मीटर पोस्ट-पेड असल्याने ग्राहकांना थकीत बिल भरण्याची मुभा होती, त्यामुळे ते आपल्या सोयीनुसार वीज देयक भरण्यास सक्षम होते. मात्र, स्मार्ट प्री-पेड वीज मीटरमुळे पुरेशा रिचार्ज अभावी वीज पुरवठा खंडित होण्याचा धोका निर्माण होतो. यामुळे विशेषतः सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागणार आहे.

रिचार्ज मीटरमुळे वीज कंपन्यांना फायदा होणार असला तरी ग्राहकांवर निश्चित बोझ्या व त्रास वाढणार आहे. अनेक नागरिकांच्या बँक खात्यात पैसे जमा असतील याची शाश्वती नसते, त्यामुळे त्यांना रिचार्ज प्रक्रियेत अडचणी येऊ शकतात. तसेच ग्रामीण भागात वीजपुरवठा खंडित होण्याची समस्या निर्माण होऊ शकते.

या समस्येवर त्वरित तोडगा काढण्यासाठी सरकारने नागरिकांच्या तक्रारी आणि मागण्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. रिचार्ज मीटरच्या फायदे आणि तोटे यांचे निष्पक्ष मूल्यांकन करत, वीज ग्राहकांना सरसकट स्मार्ट प्री-पेड वीज मीटर जोडणी सक्ती रद्द करावी आणि लोकभावना लक्षात घेऊन पूर्ववत जुने वीज मीटर देण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

# शासनाने विद्यार्थ्यांना पूर्ण गणवेशच पुरवावेत पुरोगामी शिक्षक संघटनेची शासनाकडे मागणी

### ११० रुपयात गणवेश शिवून देणाऱ्याच्या शोधात शिक्षक ?

**मूल । प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांच्या मोफत गणवेश योजनेबाबत राज्यातील शिक्षक व पालकांच्या वतीने आलेल्या सुचनांचा विचार करून राज्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पूर्ण गणवेशच मिळावा अथवा शीलाई अनूदान वाढवून मिळावे अशी मागणी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील, राज्यसरचिटनिस हरीश ससनकर यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे नुकतीच केली आली. निवेदनात राज्यातील सर्व विदयार्थ्यांना मोफत गणवेश वितरीत करण्याच्या निर्णयाबद्दल शासनाचे मनस्वी अभिनंदन करण्यात आले. सर्व विदयार्थ्यांना भेदभाव विरहीत गणवेश मिळावा ही संघटनेची अनेक दिवसांची मागणी पुर्ण होत असल्याबद्दल व सोबतच सर्व विदयार्थ्यांना बुट पायमोजे सुद्धा मोफत वितरीत होत असल्याबद्दल संघटनेच्यावतीने शासनाचे आभार व्यक्त करण्यात येत आहे. मात्र सन २०२४-२५ मध्ये राज्यावरून सर्व विदयार्थ्यांना गणवेश कापड वाटपाचा निर्णय होत असल्याचे आदेश आहेत. त्यामुळे गणवेश शिलाई आता स्थानिक स्तरावरून करावी लागणार आहे. याबाबत राज्यातील शिक्षक व पालकांनी संघटनेकडे काही सुचना मांडल्या आहेत. त्या पुढील सूचनांचे निवेदन संघटनेने मंत्री शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र राज्य, प्रधान सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शिक्षण आयुक्त शालेय



शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे तसेच राज्य प्रकल्प समन्वयक तथा सहसंचालक (प्रशासन) महा.प्रा.शि.परिषद पुणे यांना ई-मेल द्वारे पाठविण्यात आले.त्यात विद्यार्थ्यांना सत्रारंभी दोन्ही पूर्ण तयारच गणवेश शासनाकडून मिळावेत. एक राज्य एक गणवेश योजनेअंतर्गत राज्यस्तरावरून एका गणवेशासाठी कापड देण्याचे नियोजन आहे व स्थानिक स्तरावर शाळा समितीने गणवेश शिलाई करून दयावी असे दि. १८ ऑक्टोंबर २०२३ व ५ जून २०२४ च्या शासननिर्णयाने आदेशित करण्यात आले आहे. मात्र शिलाईसाठी दिलेली ११० रू. ही रक्कम अत्यंत कमी असल्याने स्थानिक बचत गट त्यामध्ये गणवेश शिलाई करून देण्यास तयार नाहीत करीता शासनाच्या वतीने फक्त गणवेश कापड न पुरवता रेडिमेड गणवेश पुरवठा करण्यात यावा अथवा शिलाईसाठी रक्कम वाढवून देण्यात यावी अशी मागणी राज्य नेते विजय भोगेकर, राज्याध्यक्ष प्रसाद पाटील, राज्य सरचिटणीस हरीश ससनकर, राज्य कार्याध्यक्ष प्रकाश पाध्ये, राज्य कोषाध्यक्ष जी.एस.मंगनाळे,राज्य महिला पदाधिकारी डॉ.अल्काताई ठाकरे, शारदा वाडकर जिल्हाध्यक्ष किशोर आनंदवार जिल्हा सरचिटणीस सुरेश गिलोरकर जिल्हा कार्याध्यक्ष गंगाधर बोढे जिल्हा कोषाध्यक्ष सुनिल कोहपरे कार्यालयीन सचिव दिवाकर वाघे व जिल्हा प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण खोब्रागडे यांनी निवेदनातून केली आहे.

# मिलिटरी स्कूल टीम २१ जून योगदिनी करणार माऊंट फ्रेंडशिप शिखर सर

## ना.नितीन गडकरी यांच्या शुभेच्छा प्रा.प्रवीण शेळके करणार नेतृत्व




**पुलगाव । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्य स्थानिक पुलगाव येथील इंडीयन मिलिटरी स्कूल येथील ७ आजी - माजी विद्यार्थ्यांची एक टीम प्रा. प्रवीण रमेश शेळके यांच्या नेतृत्वाखाली हिमालयातील पीर पंजाल पर्वत रांगातील १३,३४८ फूट उंचीचे बर्फाच्छादित फ्रेंडशिप शिखर सर करण्यासाठी नुकताच रवाना झाली.

इंडीयन माऊंटनेरींग फाऊंडेशन दिल्ली मार्फत मान्यता प्राप्त या शिखर मोहिमेला आपल्या भारताचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शुभेच्छा दिल्या.दिनांक १७ जून २०२४ पासून बेस कॅम्प, कॅम्प १ ,कॅम्प २ आणि समिट कॅम्प वर पोहचत २१ जून २०२४ च्या पहाटे शिखरावर पोहचून तरुणांमध्ये योग तथा व्यायामाबद्दल जाणीव आणि जागृती निर्माण करणे हा या शिखर मोहिमेचा मुख्य उद्देश आहे..या मोहिमेत विद्यालयाचा माजी विद्यार्थी आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक सागर कुंभारे, त्याचप्रमाणे आदर्श माष्टे ,आर्यन भदोरिया,समीर सातपुते, तत्व दाभार्डे,आतिश चारोडे,आणि अक्षय हिवराळे हे विद्यार्थी समाविष्ट आहेत..

मोहिमेला विद्यालयाचे अध्यक्ष मनोज भेंडे,सचिव कृष्णा कडू,कमांडंट के एच पाटील,प्राचार्य रविकिरण भोजने पर्यवेक्षक नितीन कोठे व इतर शिक्षक शिक्षकेत्तर मंडळींनी शुभेच्छा दिलेल्या आहे..

# संकटात सापडलेल्या आदिवासी शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आले चंद्रपूरचे प्रकल्प कार्यालय






**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शेतातील गोठ्याला लागलेल्या आगीमुळे बकऱ्या व कोंबड्या जळून खाक, तसेच अन्नधान्यचे नुकसान झालेल्या शेतकऱ्याच्या मदतीला आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूर कार्यालय धावून आले. तसेच तात्काळ पुढाकार घेवून कार्यालयाच्या वतीने सदर शेतकऱ्याला १ लक्ष रुपयांची मदत केली.

कोरपना तालुक्यातील खिर्डी ग्रामपंचायत अंतर्गत निजामगोंदी येथील शेतकरी कर्णू वाघू मडावी यांच्या शेतातील गोठयाला अचानक आग लागली. या भीषण दुर्घटनेत २० बक-या व दोन वासरांसह ३० कोंबडयांचा तडफडून मृत्यु झाला. ही घटना रविवारी दि. ९ जून २०२४ ला रात्री ८.३० वाजता च्या सुमारास घडली. या आगीत दोन क्विंटल गहू, तांदूळ, २५ पीव्हीसी पाईप, दहा बॅग खते व शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले. यामध्ये सुमारे ५ लाखांचे नुकसान झाल्याचे अंदाज वर्तविण्यात येत आहे.

निजामगोंदी येथील शेतकरी कर्णू वाघू मडावी यांनी शेतात गोठा बांधला. गोठयात त्यांनी २० बक-या , दोन वासरे बांधून ठेवले होते. शिवाय बेंडव्यात ३० कोंबड्या ठेवल्या होत्या. हा गोठा गावापासून अर्धा किमी अंतरावर असून गहू, तांदूळ व शेतीसाठी लागणारे सर्व साहित्य त्यांनी तिथे ठेवले होते. शेतकरी मडावी हे रोज गोठ्यातच जागली करायचे. मात्र रविवारी काही कामानिमित्त ते बाहेरगावी गेले. त्यामुळे गोठ्यात राखणीसाठी कुणीच नव्हते. दरम्यान रात्री अचानक ८.३० वाजातच्या सुमारास अचानक गोठयाला आग लागली. त्यामध्ये सर्व साहित्य जळून खाक झाले व बक-या, वासरे, कोंबळया जळून मृत्यु पावल्याचे दिसून आले.सदर घटनेची माहिती मिळताच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी कार्यालयातील निरीक्षक यांना घटनास्थाळी भेट देण्याचे आदेश दिले. त्या नुसार निरीक्षक यांनी शेतकरी कर्णू वाघू मडावी यांची भेट घेवून त्याठिकाणी घडलेल्या घटनेचा संपूर्ण आढावा घेतला. त्यानंतर प्रकल्प अधिकारी यांनी कार्यालय अंतर्गत येणा-या कार्यालयीन, वसतिगृह, शासकीय आश्रम शाळा व सर्व कार्यालयीन कर्मचा-यांना सदर शेतक-याला आर्थिक मदत करण्याची विनंती केली. त्या अनुषंगाने कर्मचा-यांनी एका दिवसात एकुण ५१,५०० रुपयाचा मदत निधी गोळा केला.तसेच अनुसुचित जमातीच्या लोकांना आपात्कालीन / नैसर्गिक/ अमानवीय परिस्थितीमध्ये अर्थसहाय्य देणे/ तदर्थ समितीच्या शिफारशीनुसार ५० हजार पर्यंतची मदत या योजनेअंतर्गत एकुण ५० हजार तात्काळ मंजूर करून घेतले. अशा प्रकारे एकूण रूपये १ लक्ष १हजार ५०० रुपयांची आर्थिक मदत सदर शेतक-याला १४ जून रोजी प्रत्यक्ष घरी जावून देण्यात आली. यावेळी प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार, सहाय्यक प्रकल्प अधिकारी डी. के. टिंगुसले, गिरीश पोळ, लेखाधिकारी संजय जगताप,आदिवासी विकास निरीक्षक अमोल नवलकर उपस्थित होते.कर्तव्यदक्ष प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांची यांनी पिडीत शेतक-याला एकुण १ लक्ष १हजार ५०० रूपयांची तात्काळ आर्थिक मदत वसतिगृह, शासकीय आश्रम शाळा व सर्व कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने प्राप्त करून दिली. सदर शेतक-याला ही मदत त्याला दुखातून सावरण्यात नक्कीच फायदेशीर ठरेल यात शंका नाही.

# ....आणि पटले भारतालाही अक्षय ऊर्जेचे महत्त्व!

**पवन ऊर्जेच्या क्षमतेला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी १५ जून रोजी जागतिक पवन दिन साजरा केला जातो. पवन दिवस आपली शक्ती आणि जगभरातील ऊर्जा प्रणालींना पुन्हा आकार देण्याची क्षमता समोर आणतो. या स्थितीत पाणी, वारा इत्यादी नैसर्गिक अपारंपरिक ऊर्जेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. सदर सुंदर ज्ञानवर्धक माहितीचा संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींनी प्रस्तुत केलाय... संपादक.**

१५ जून हा दिवस जगभरात जागतिक वायू दिन म्हणून साजरा केला जातो. प्रत्येकाला अपारंपरिक ऊर्जा म्हणून पवन ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी जागतिक पवन दिन साजरा केला जातो. मानवी संस्कृतीच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे पर्यावरणाचा हळूहळू ऱ्हास होत आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे हवामान झपाट्याने बदलत आहे ज्यामुळे मानवी सभ्यता नष्ट होते असे मानले जाते. पवन ऊर्जेच्या क्षमतेला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी १५ जून रोजी जागतिक पवन दिन साजरा केला जातो. पवन दिवस आपली शक्ती आणि जगभरातील ऊर्जा प्रणालींना पुनर्आकार देण्याची क्षमता समोर आणतो. या स्थितीत पाणी, वारा इत्यादी नैसर्गिक अपारंपरिक ऊर्जेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. निसर्गाचा नाश करण्याऐवजी त्याच्या विविध शक्तींचा वापर कसा करता येईल याकडे विज्ञानाची वाटचाल सुरू आहे. वाऱ्याच्या शक्तीबद्दल आणि त्याचा वापर कसा करता येईल याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी जागतिक पवन दिन साजरा केला जातो. इतकेच नाही तर या अपारंपरिक ऊर्जेचा वापर करण्याचे फायदे आणि आतापर्यंत या ऊर्जेचा वापर कसा करायचा याचेही निरीक्षण या दिवसात केले जाते. सन २००७मध्ये पहिल्यांदा हवा दिन–विंड डे १५ जून रोजी साजरा करण्यात आला. पण तेव्हा तो फक्त वाऱ्याचा दिवस होता. दोन वर्षांनंतर सन २००९मध्ये सद्याचे नाव देण्यात आले. तेव्हा विंड युरोप आणि ग्लोबल विंड एनर्जी कौन्सिलने भागीदारी केली आणि त्याला जागतिक पवन दिवस असे नाव दिले. पवन ऊर्जा म्हणजे काय? तर हवा ही गतिमान आणि ऊर्जेचा एक प्रकार आहे. हे आपल्या वातावरणातील हवेच्या दाबातील फरकामुळे होते. उच्च दाबाखालील हवा कमी दाबाच्या क्षेत्राकडे जाते. दाबाचा फरक जितका जास्त असेल तितक्या वेगाने हवा वाहते.

सदर जागतिक वायू दिन प्रत्येक वर्षी न चुकता साजरा केला जातो. हा दिवस पवन ऊर्जेचे महत्व समजणे आणि त्याच्या क्षमतेविषयी जागरुकता वाढवण्यासाठी समर्पित आहे. संयुक्त राष्ट्रसंघाचे सर्व सदस्यदेश दरवर्षी हा दिवस साजरा करतात. या दिवसाचे आयोजन करताना शाश्वत पर्यायी उर्जेचा विचार केला जातो. या वर्षी म्हणजेच २०२४मध्ये १७वा जागतिक पवन दिवस साजरा केला जात आहे. हवा एक शक्तीशाली नैसर्गिक संसाधन आहे. ज्यातून ऊर्जा निर्मिती होऊ शकते. हे लक्षात घेऊन जागतिक वायू दिनी संयुक्त राष्ट्रसंघांचे सर्व सदस्य देश पवन उर्जेचा उत्सव साजरा करतात. त्यासाठी कार्यक्रम आयोजित करतात. युरोपियन पवन ऊर्जा संघाने सन २००७मध्ये हा दिवस पहिल्यांदा साजरा केला होता. काही काळाने ग्लोबल विंड एनर्जी काउंसिलच्या मदतीने हा दिवस संपूर्ण जगभर साजरा केला जाऊ लागला. त्यानंतर सन २००९मध्ये या दिवसाला वैश्विक स्तरावर साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. या दिवसाचा हेतू हा स्वच्छ हवेचे महत्व जगाला पटवून देणे हा आहे. शिवाय वातावरणात असलेला भरपूर प्रमाणातला कार्बन याविषयी जागरुकता यानिमित्ताने केली जाते. बरेच लोक या दिवशी किनाऱ्यावरील आणि ऑफशोअर विंड फार्मला देखील भेट देतात. या दिवशी लोक मोहिमेत सामील होतात, तसेच पवन ऊर्जेसंबंधी सर्व प्रकारची माहिती मिळवतात. या दिवसानिमित्त अनेक शहरांमध्ये कार्यशाळा आयोजित केल्या जातात, जेणेकरून लोकांना हवेसारख्या शक्तिशाली नैसर्गिक स्त्रोताचे महत्त्व समजावे. यानिमित्त अनेक शहरांमध्ये पवन परेडचे आयोजनही केले जाते. वाढत्या लोकसंख्येमुळे भारतालाही अक्षय ऊर्जेचे महत्त्व समजले आहे. पवन ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात भारत हा जगातील चौथ्या क्रमांकाचा देश आहे, ज्यामध्ये तामिळनाडूचा वाटा सर्वाधिक आहे. भारतातील पवन ऊर्जा प्रकल्पांची एकूण स्थापित क्षमता ४० गीगा वॅटच्या जवळपास आहे.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

आज जगभरात जागतिक पवन दिवस साजरा केला जात आहे. याला जागतिक पवन दिवस किंवा वर्ल्ड विंड डे असेही म्हणतात. हा जगभरातील कार्यक्रम आहे, जो दरवर्षी १५ जून रोजी होतो. पवनऊर्जा आणि त्याचा उपयोग याबद्दल जागरूकता वाढवणे हा या दिवसाचा उद्देश आहे. पवन ऊर्जेचे महत्त्व आणि ते जग कसे सुधारू शकते यासाठी हा दिवस जगभरात साजरा केला जातो. हवेशिवाय जीवन कसे असेल याचा विचार करणेही अशक्य वाटते. हवा असेल तर जीवन आहे. आजही जगभरातील शास्त्रज्ञ इतर अनेक ग्रहांवर हवा शोधत आहेत. जागतिक पवन दिनानिमित्त ७५हून अधिक देशांमध्ये कार्यक्रम आयोजित केले जातात. जागतिक पवन दिवसाचा इतिहास ग्लोबल विंड डेचे आयोजन युरोपियन विंड एनर्जी असोसिएशन आणि ग्लोबल विंड एनर्जी कौन्सिल आणि राष्ट्रीय संघटनांद्वारे केले जाते. या दिवसाची स्थापना सामान्य लोकांना पवन ऊर्जा आणि त्याचे फायदे जाणून घेण्यासाठी करण्यात आली. सन २००९पर्यंत जागतिक पवन दिवस किंवा ग्लोबल विंड डे नव्हता. त्यानंतर हा दिवस अधिक सर्वसमावेशक बनला आणि लोकांपर्यंत पोहोचवला गेला आहे. पण आज जगावर घोंगावतय वेगळच संकट! अटलांटिक प्रवाहावरील संशोधनातून धक्कादायक माहिती मिळाली आहे, आपण अशा काळात जगत आहोत, जिथे जगभरात ग्लोबल वार्मिंगचा धोका आहे. अशा परिस्थितीत पवन ऊर्जेसारख्या उर्जेचा कार्यक्षमतेने वापर करणे महत्त्वाचे ठरते. पवन ऊर्जा सध्या एक परिपक्व आणि मुख्य प्रवाहातील तंत्रज्ञान आहे. सन २०१५मध्ये १०० अब्ज डॉलरपेक्षा जास्त गुंतवणुकीसह हे जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक क्षेत्रांपैकी एक आहे. एकट्या इयूमध्ये पवन उद्योगाने गेल्या वर्षभरात गॅस आणि कोळसा यांच्या तुलनेत जास्त क्षेत्र व्यापलं आहे. हे क्षेत्राच्या १५ टक्के विजेच्या वापराची पूर्तता करण्यासाठी पुरेशा संचयी स्थापित क्षमतेसह केले जाते, जे ८७ दशलक्ष घरांना वीज पुरवण्याइतके आहे. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व खूप मोठे आहे, अधिकाधिक लोकांना पवनऊर्जेची माहिती व्हावी. भारतात वाढणारी लोकसंख्या पाहता भविष्यात मोठ्या प्रमाणात उर्जेची गरज भासणार आहे. देशानेही पवन उर्जेचे महत्व ओळखलं आहे. भारत पवन उर्जेच्या बाबती जगात चौथ्या क्रमांकावर आहे. ज्यात सर्वाधिक योगदान तमिळनाडू राज्याचे आहे. देशातील पवन उर्जेच्या माध्यमातून ४० गीगा वॅट उर्जेचे उत्पादन केले जाते. हवाप्रदूषणाच्या दुष्परिणामांबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण होण्यासाठी आणि त्याविरोधात कृती करण्यासाठी जगभरात आज प्रथमच जागतिक निळ्याशार आकाशासाठी स्वच्छ हवा– क्लीन एअर फॉर ब्लू स्काय दिन साजरा केला गेला. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये संयुक्त राष्ट्र– यूएनच्या महासभेत झालेल्या ठरावाचा एक भाग म्हणून आजचा दिवस साजरा करण्याचा निर्णय झाला. फुफ्फुसाच्या कर्करोगाला कारणीभूत ठरणारी प्रदूषित हवा पर्यावरणाचीही कायमस्वरुपी हानी करत असल्याने त्याकडे अधिक दुर्लक्ष करणे धोक्याचे ठरेल, असे संयुक्त राष्ट्रांनी आज म्हटले आहे. हवा प्रदूषणाचे धोके सर्वांसमोर प्रकर्षाने समोर यावेत आणि सर्व देशांनी हा धोका कमी करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, हा हेतू समोर ठेवून दरवर्षी सात सप्टेंबर दिवस जागतिक निळ्याशार आकाशासाठी स्वच्छ हवा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार आज संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरेस यांनी सर्व देशांशी संवाद साधताना शाश्वत विकासासाठी आणि स्वच्छ ऊर्जेसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन सर्व देशांना केले. शाश्वत विकास परिषदेत बहुतांशी देशांनी चांगल्या भविष्यासाठी शाश्वत विकासाला प्राधान्य देण्याचे मान्य केले आहे.

संयुक्त राष्ट्रांचे देशांना आवाहन केले आहे– तापमानवाढीवर नियंत्रण ठेवा, प्रदूषण कमी करण्यासाठी योजना आखा. जैविक इंधनावरील अनुदान बंद करा. स्वच्छ ऊर्जेच्या वापरावर भर द्या. पर्यावरण बचावासाठी जागतिक पातळीवर सहकार्य वाढवा. सध्याच्या कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर हा दिवस साजरा करण्याला अधिक महत्त्व आले आहे. व्यक्तिगत, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शाश्वत विकासाकडे वाटचाल करतानाच हवाप्रदूषणाकडे आणि त्यापासून असलेल्या धोक्यांकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.

!! आंतरराष्ट्रीय वायू दिनाच्या समस्त मानवमात्रांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

## फिट इंडिया तायक्कांदो चॅम्पियनशिप मध्ये वर्धा जिल्हातील खेळाडूचे सुयश

**पुलगाव । प्रतिनिधी**

मेजर ध्यानचंद किडा स्टेडियम आमगाव जिल्हा गोदिंया येथे नुकताच पार पडलेल्या फिट इंडियाख खुल्या तायक्कांदो चॅम्पियनशिप २०२४ मध्ये वर्धा जिल्हातील तायक्कांदो खेळाडूनी उत्कृष्ट कामगिरी करत यश प्राप्त केले.

यात सुवर्ण पदक विजेते भार्गवी कोंबे,स्वरा ढोक ,रितिका सिंग , ऋषिकेश जांभूळकर रौप्य पदक विजेते स्वानंदी ढोक ,आदिनाथ नायर ,आयुष हमद,तनवी येलरपूरे,कार्तिक शेळके,ओम चौधरी ,शुभांगी उमरे, कास्य पदक विजेते सार्थक नितनवरे,वैदही नितनवरे,श्रुती खैरे ,अथर्व चिखलकर या सर्व खेळाडू नी यश प्राप्त केले तसेच या स्पर्धेत ६०० खेळाडू सहभागी झाले होते. ही स्पर्धा सेसर प्रणाली मध्ये पार पडली.तायक्कांदो स्पोर्ट असोसिएशन जिल्हा वर्धा ह्या संपूर्ण जिल्हातील खेळाडूनी फिट इंडिया तायक्कांदो चॅम्पियनशिप मध्ये भरघोस यश प्राप्त केले. त्याबद्द्ल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. हे खेळाडू आपल्या विजयाचे श्रेय जिल्हा सचिव शाम खेमस्कर , पंच विशाल मडावी, भूषण वाठोळे व आपल्या आई वडीलास देत आहे .



## वनजमीनीवरील प्रलंबित सहा पूल व ३३ केव्ही उपकेंद्र बांधकामा मार्ग मोकळा

### जिल्हास्तरीय वनहक्क समितीच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी दिली परवानगी

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील दुब्बागुडा–दामरंचा रस्त्यामधील बांडीया नदीवर पूल व जोड रस्ता बांधकाम तसेच भाडभिडी–घोट–रेगडी–कसनसुर–गट्टा– कोठी–आरेवाडा–भामरागड ते राज्य सीमा रस्त्यावरील ५ लहान पुलाचे बांधकाम तसेच पिरमिली येथील ३३ केव्ही वीज उपकेंद्रच्या बांधकामाला जिल्हास्तरीय वनक्क समितीचे अध्यक्ष तथा प्रभारी जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी मंजूरी दिली. यामुळे वनकायद्यामुळे प्रलंबित या पुलाच्या बांधकामाचा मार्ग मोकळा झाला आहे.

जिल्हास्तरी वनहक्क समितीची सभा काल श्री भाकरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, पूनम पाटे तसेच वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळी ६ नवीन व अपील प्रकरणातील १ वनहक्काचे दावे मंजूर करण्यात आले तर २ नवीन व ७ अपील प्रकरणातील दावे फेरचौकशीसाठी पाठविण्यात आले. यासोबतच ४६ वनहक्कधारकांच्या सुधारित वनहक्क पट्टे तयार करण्यास मान्यता देण्यात आली.बैठकीत वनविभाग व महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



## मालमत्ता करवाढी विरोधात भाजपचे निवेदन



**पुलगाव । प्रतिनिधी**

नगर परिषद पुलगाव मार्फत सन २०२४–२५ ते २०२७–२८ या चतुर्थ वार्षिक वर्षाकरिता नवीन मालमत्ता कर आकारणी करण्यात आली. यामध्ये मोठ्या प्रमाणात अवास्तव कर आकारणी करण्यात आली. पुलगाव शहरामध्ये मोठया प्रमाणात मजूर वर्ग असल्यामुळे पुलगावकर जनतेचे उत्पन्न अत्यल्प आहे. सदर वाढलेले मालमत्ता कर हे पुलगावकर जनतेवर केलेला एकप्रकारे अन्यायच आहे, त्यामुळे वाढीव मालमत्ता कर आम्हास मान्य नसून हा कर ताबडतोब रद्द करावा अन्यथा भारतीय जनता पार्टी तर्फे प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असे निवेदन १४ जून ला भारतीय जनता पार्टी व ओबीसी मोर्चा तर्फे मुख्याधिकारी नगर परिषद पुलगाव यांना देण्यात आले.


याप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, भाजपा शहर अध्यक्ष नितीन बडगे, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश सचिव शकीलजी खान, ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष संदीप बोरकुटे, जिल्हा सचिव राजेश गुप्ता, शहर अध्यक्ष अनिल लेकुरवाळे, आशिष गांधी, आकाश दुबे, ड. अजय तिवारी, प्रितम अरोरा, सुरेश सुखीजा, राजकुमार पनपालिया, मनोज वालदे, रिचर्ड क्रॉस, विशाल धोपाडे,भगवानजी ठाकूर,चिंटू दुबे, विजय ढगे, मोरेश्वरराव नंदनवार, संजय डोरलीकर, सुनिल अरोरा हे उपस्थित होते.

## डॉ.ज्ञानेश हटवार महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर

### विविध क्षेत्रातील कार्याबद्दल सन्मान...

**भद्रावती । प्रतिनिधी**

शैक्षणिक, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल सिने आर्क मुंबई संस्थेकडून देण्यात येणारा प्रतिष्ठेचा महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२३– २४ डॉ ज्ञानेश हटवार भद्रावती यांना जाहीर झाला आहे. १५ जून रोजी पुणे येथे आयोजित समारंभात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.



डॉ ज्ञानेश हटवार हे मागील २४ वर्षापासून यशवंतराव शिंदे कनिष्ठ महाविद्यालय चिचोर्डी भद्रावती येथे विद्यादानाचे कार्य करत आहेत. त्यांनी विद्यादानाचे कार्य करत असतानाच गोडवाना विद्यापीठ गडचिरोली ची आचार्य पदवी प्राप्त केलेली आहे. अनेक सामाजिक संघटना ते कार्यरत आहेत. तसेच पत्रकारितेचे क्षेत्रात सुद्धा ते कार्यरत आहेत. त्यांच्या या विविध क्षेत्रातील कार्याबद्दल महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.डॉ ज्ञानेश हटवार यांनी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक संघाचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन आनंदवन वरोरा येथे यशस्वी पणे घेतले. ते या संघटनेचे चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी म्हणून राज्य कार्यकारणीत कार्यरत आहेत. शिक्षक भारती संघटनेचे नागपूर विभाग प्रसिद्ध प्रमुख आहेत. शैक्षणिक क्षेत्रात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. तसेच विदर्भ साहित्य संघ शाखा भद्रावतीचे ते सचिव आहेत. पुरोगामी पत्रकार संघ भद्रावतीचे अध्यक्ष आहेत. गुरूदेव सेवा मंडळ, रोटरी क्लब, झाडीबोली साहित्य मंडळ भद्रावतीचे सदस्य आहेत. त्यांचे नियतकालिकेत विविध लेख प्रकाशित आहेत. विविध सामाजिक, साहित्यिक उपक्रमात त्यांचा सहभाग असतो. त्यांच्या या विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन सीने आर्क मुंबई या संस्थेकडून प्रतिष्ठेचा महाराष्ट्र रत्न पुरस्कार पुणे येथे होणाऱ्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे.

## अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी वसतीगृह प्रवेश ऑनलाइन निश्चित करावा

**गडचिरोली**–एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली अंतर्गत अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता १३ मुलांचे व ८ मुलींचे असे एकुण २१ शासकीय वसतीगृह कार्यरत आहेत. त्यांची एकुण इमारत प्रवेश क्षमता २११५असुन त्यातील सन २०२४–२५ करीता रीक्त जागांवर प्रवेश घेण्याकरीता ुिूरा.ारहेरपश्रळपश.सेीं.ळप या प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा. गडचिरोली येथे मुलांचे दोन व मुलींचे एक असे एकुण तीन वसतीगृह आहेत. गडचिरोली वसतीगृहात इयत्ता ११ वी ते पदवी, पदव्युत्तर तसेच व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. तसेच गडचिरोलीचे तीन वसतीगृह वगळता उर्वरीत अठरा वसतीगृहात इयत्ता ८ वी पासुन पुढे शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.वरील संकेतस्थळावर विद्यार्थ्यांनी अर्ज भरतांना सदर प्रणालीमध्ये दिलेल्या सुचनांचे काळजीपुर्वक वाचन करावे तसेच सदरील सुचनेनुसार कागदपत्रांची जोडणी करण्यात यावी.वसतीगृहातील जुने प्रवेशित विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेऊन अर्ज रिन्यूव हे ऑप्शन निवडुन भरावे. असे न केल्यास सदर विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला आहे असे समजुन त्याचेजागी नविन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढुन कागदपत्रांसह हार्ड कॉपी संबंधीत वसतीगृहात एक आठवड्याच्या आत सादर करावी. वसतीगृह प्रवेशाचे संकेतस्थळ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता दिनांक ३१ जुलै २०२४ पर्यत व व्यावसायीक अभ्यासक्रमा करीता ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत सुरू राहील त्यामुळे विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर अर्ज सादर करावे. तसेच प्रवेशाबाबतच्या लोकप्रतिनिधी शिफारशी दिनांक २५ ऑगस्ट २०२४ पर्यंत प्रकल्प कार्यालयात सादर करावे, असे सहायक प्रकल्प अधिकारी धनराज डबले यांनी कळविले आहे.

## आदिवासी खातेदारांना जमीन तारण ठेवण्यासाठी परवानगीची गरज नाही;एका तक्रारीवर सर्वांसाठी जिल्हाधिकाऱ्यांचे परिपत्रक

**गडचिरोली । प्रतिनिधी**

आदिवासी खातेदारांना कर्ज घेतांना जमीन अथवा शेती गहाण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या परवानगीची आवश्यकता नसल्याने वित्तीय संस्थांनी त्यांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याबाबतचे परिपत्रक प्रभारी जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी निर्गमित केले आहे. विशेष म्हणजे केवळ एक तक्रार अर्जावरील निकालाचा जिल्ह्यातील सर्व आदिवासी खातेदारांना लाभ होणार आहे.

कोटगल येथील तुळशिराम नरोटे यांनी याबाबत बँकेकडून नाहक त्रास दिल्या जात असल्याबाबत जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार दाखल केली होती. त्यांचे प्रकरण निकाली काढतांना या बाबीचा इतरांनाही अडचण येत असल्याची जाणवल्याने ठोस उपाय योजना म्हणून जिल्हाधिकारी भाकरे यांनी सर्वांना याला लाभा व्हावा म्हणून परिपत्रक निर्गमित करून जमीन तारणाबाबत शासनाच्या महसूल संहितेकडे वित्तीय संस्थांचे लक्ष वेधले आहे.

पुर्वस्थिती : बऱ्याच ठिकाणी सहकारी संस्था, तसेच राष्ट्रीयकृत बँका, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधिल नविन कलम ३६– अ कडे लक्ष वेधुन अनुसुचित जमातीतील व्यक्तींना कर्जासाठी जमीन तारण द्यावयाची झाल्यास, त्याकरीता जिल्हाधिकारी यांची पुर्व परवानगी आवश्यक असल्याचे जाचक अट कळवितात. त्यामुळे आदिवासी खातेदारास शासन, राष्ट्रीयकृत बँका, सहकारी संस्था यांचेकडुन पिककर्ज तसेच इतर कर्ज घेण्यास नाहक त्रास सहन करावे लागतो व विनाकारण जिल्हा मुख्यालयात पुर्व परवानगी मिळणेसाठी फेऱ्या माराव्या लागतात.

वस्तुस्थिती : महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सन १९७१ च्या ३६ व्या अधिनियमाने सुधारणा केल्यानंतर कलम ३६ (४) मधील तरतुदीनुसार, आदिवासी किंवा इतर कर्जदार वर्ग–२ म्हणजे ज्या जमीनीच्या हस्तांतरणावर निर्बंध आहेत, अशा जमीन धारकाबाबत महसुल संहितेत अगर इतर अधिनियमात कोणत्याही तरतुदी असल्या तरी सुध्दा त्यांना शासन, सहकारी संस्था, राष्ट्रीयकृत बँका इत्यादीकडुन कर्ज मिळण्यासाठी जमीन तारण, गहाण ठेवावयाची झाल्यास, त्यासाठी जिल्हाधिकारी यांची पुर्व परवानगीची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

यांना होणार लाभ : गडचिरोली जिल्हाची आदिवासीबहुल, नक्षलग्रस्त व शेतीप्रधान जिल्हा म्हणुन ओळख आहे. सन २०११ चे जनगणनेनुसार गडचिरोली जिल्ह्यातील अनुसुचित जमातीची लोकसंख्या ४ लाख १५ हजार ३०६ असुन, एकुण लोकसंख्येच्या ३८.७१ टक्के आहे. तसेच, जिल्ह्यात एकुण १ लाख ७८ हजार ९०३ अनुसुचित जमातीचे खातेदार आहेत. जिल्ह्यातील एटापल्ली, भामरागड, धानोरा, अहेरी, सिरोंचा, कुरखेडा व कोरची या तालुक्यात अनुसुचित जमातीचे खातेदाराची संख्या साधारणत: ८५ टक्के आहे. या सर्वांना या परिपत्रकाचा लाभ होवून त्यांना विनाकारण जिल्हाधिकारी कार्यालयात फेरे मारावे लागणार नाही.

# गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेचा निधी त्वरित वितरित करा; गोशाळा संचालक तथा गोसेवककांची जिल्हा प्रशासनाकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र मधील गोशाळांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता महाराष्ट्र शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशन एप्रिल २०२३ मध्ये महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे गठन केले. त्याचप्रमाणे गोसेवा आयोगासोबतच गोशाळांना अनुदान करता १०० कोटी रुपये मंजूर केले त्यात (७० कोटी रुपये गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना) (२० कोटी रुपये गोमय मूल्यवर्धन योजना) (१० कोटी रुपये गोसेवा आयोग) परंतु पशुसंवर्धन सचिव तुकाराम मुंढे यांनी गोसेवा आयोगाची नियमावली तयार न केल्यामुळे एक वर्ष होऊन सुद्धा आयोगाला कोणत्याही प्रकारचे अधिकार, मंजूर १०० कोटी रुपये अनुदान व आयोगाला कर्मचारी उपलब्ध होऊ शकले नाही. शासन सकारात्मक असून सुद्धा प्रशासन नकारात्मक असल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व गोशाळाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेचा निधी त्वरित वितरित करा या व इतर अनेक मागण्यांचे निवेदन जिल्ह्यातील गोशाळा संचालक तथा गोसेवक यांच्याकडून प्रशासनाला देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने गोशाळा बांधकामा करिता गोवर्धन गोवंश सेवा केंद्र सुधारित ही योजना कार्यान्वित केली. सर्व शासकीय नियमानुसार गोशाळा कडून प्रस्ताव मागविण्यात आले या प्रस्तावाची पशुसंवर्धन विभाग मार्फत तपासणी अपंग, अपघातग्रस्त गोवंशला प्रति दिवस करण्यात आली व मा. पशुसंवर्धन मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या गोवर्धन गोवंश सेवा केंद्र निवड समितीद्वारे महाराष्ट्रातील १८२ गोशाळांची निवड करण्यात आली. शासन निर्णय १६ फेब्रुवारी २०२४ रोजी शासन निर्णय करून वरील गोशाळांना निधी मंजूर करण्यात आला परंतु पशुसंवर्धन विभागाचे सचिव तुकाराम मुंडे यांच्या अडेलतट्टू धोरणामुळे मंजूर निधी वितरणात विलंब करून तो शासनाकडे परत पाठविण्यात आला. महाराष्ट्रामध्ये ४ मार्च २०१५ रोजी महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा (सुधारित) नुसार अंमलबजावणी झाली. बहुतांशी गोशाळांकडून कत्तलीसाठी

जाणारा गोवंश स्थानिक पोलीस प्रशासनाने जम केल्यानंतर अशा वृद्ध आजारी, जखमी गोवंशाचे संगोपन करण्यासाठी ॲपिडद्युबेट घेण्यात आले. जीवट्या, जीवरक्षा होऊन गोवंश जीवीत राहावा म्हणून गोशाळांना शासकीय आर्थिक मदत नसताना सुद्धा सर्व गोशाळा जाम गोवंश स्विकारून समाजातून दान घेऊन त्यांचे संगोपन करीत आहेत. या सर्व गोवंशाच्या संगोपणाकरिता भारतातील अन्य राज्यात मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान व उत्तरप्रदेश मध्ये प्रति दिवस सप्रति गोवंश प्रमाणे अनुदान देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने सुद्धा राज्यातील गोशाळा मधील वृद्ध, भाकड,



प्रति गोवंश १०० रुपये अनुदान देण्यात यावे. २७ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या महाराष्ट्र शासन निर्णयानुसार सर्व पहुंचे इअरटॅगिंग व नोंदणी बंधनकारक करण्यात आली. त्यामध्ये नमूद पशुधनाची वाहतूक इअरटॅगिंग शिवाय करता येणार नाही. तसेच बाहेरच्या राज्यातून महाराष्ट्रात वाहतूक करता येणार नाही या कायद्याची पोलीस प्रशासना द्वारा कडक अंमलबजावणी करण्यात यावी, महाराष्ट्रामध्ये खूप मोठे प्रमाणावर गायरान जमिनी उपलब्ध होत्या परंतु प्रशासनाचे निष्काळजीपणामुळे त्या गायरान जमिनीवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे. आज गोशाळेतील व गावातील गाईना चरण्याकरिता जमीन उपलब्ध नाही त्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर भाकड, वृद्ध, अपंग गोवंशाची विक्री करत आहे. गायीच्या हक्काची जमीन गाईला मिळावी याकरिता गायरान जमिनीवरील अतिक्रमण शासनाने त्वरित काढावे. पशुसंवर्धन सचिव तुकाराम मुंडे यांचे अडेलतडू धोरणामुळे एक वर्ष होऊन सुद्धा गोडसेवा आयोग सुरू होऊ शकले नाही त्यामुळे महाराष्ट्रातील गोशाळेचे खूप मोठे नुकसान झाले त्यामुळे अशा सचिवांची त्वरित बदली करण्यात यावी अशा प्रकारची मागणी गोशाळा महासंघ कडून करण्यात येत आहे. बरील सर्व बाबींमुळे महाराष्ट्रातील १०६५ गोशाळा पालकामध्ये प्रचंड नाराजी असून गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेचा निधी त्वरित वितरीत करण्यात याथा, गोसेवा आयोगला कर्मचारी व इतर त्यांचे अधिकार देण्यात यावे. गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही योजना गोसेवा आयोगाच्या माध्यमातून राबविण्यात यावी. सर्व गोशाळांमधील गोवंशाला प्रति दिवस प्रति गोवंश १०० रुपये प्रमाणे चार अनुदान त्वरित देण्यात बाचे. संपूर्ण गोवंश हत्या बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी साठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात. पशुसंवर्धन विभागाचे सचिव श्री. तुकारामजी मुंढे साहेब यांचे त्वरित बदली करण्यात यावी. गावरान जमिनीवरील अतिक्रमण त्वरित काढण्यात बाचे. जिल्ह्यातील सर्व गोशाळा ट्रस्टी, संचालक, गोरक्षक, गोपालकांकडून असे निवेदन देण्यात आले. या सर्व मागण्या मान्य न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रात प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. या निवेदनावर जिल्हाभरातील गोशाळा संचालक तथा गोसेवक, रतन कोठारी, सुनील आपटे गणेश गुरखुदे यांच्यासह शनिप्रसाद गोशाळा राक्षसभुवन लक्ष्मी माता गोशाळा टोकेवाडी, राधाई गोशाळा ता. पाटोदा जि. बीड स्वामी विवेकानंद गोशाळा ता. गेवराई भुवनेश्वर गोशाळा वैतागवाडी ता.जि. बीड, चैतन्य गोशाळा देवळाली ता. आशी, संपदा गोशाळा गावंदरा, गोसेवा प्रमुख रवी देशमुख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# श्रृतपंचमी महोत्सवानिमित्त आर्यनंदी कॉलनी जैन मंदिरात विविध कार्यक्रम उत्साहात

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर येथील श्री.१००८ चंद्रप्रभू खंडेलवाल दिगंबर जैन मंदिरात श्रृतपंचमी महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व कार्यक्रम भक्तिभावाने उत्साहात पार पडले.

प्रथम सकाळी ७ वाजता ग्रंथांना सजवून ते डोक्यावर घेवून भव्य ग्रंथ शोभायात्रा काढण्यात आली. ही शोभायात्रा आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर, राष्ट्रसंत आचार्य पुलकसागरजी महाराज चौक मार्गाने आर्यनंदी कॉलनी जैन मंदिरात विसर्जित करण्यात आली. शोभायात्रेत महिलांनी पांढऱ्या साड्या तर पुरुषांनी सोहळ्याचे वस्त्र परिधान केले होते. जैन ध्वज पुढे घेवून चालत होते.

तद्नंतर मंदिरात भगवान चंद्रप्रभू यांच्या





व षटखंडागम ग्रंथासमोर आरसा ठेवून प्रतिकृतीचा भव्य पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी शांतिमंत्राचे पठनही करण्यात आले.

यावेळी शोभायात्रेत महिलांनी व पुरुषांनी षटखंडागम, महापुराण, पदमपुराण, जैन सिद्धांत कोष, भगवान महावीर पुराण, २४ तिर्थंकर पुराण आदी धार्मिक ग्रंथ ठेवून पुढे चालत होत्या. तसेच शोभायात्रेत धार्मिक घोषणा देऊन संपूर्ण परिसर धर्ममय झाला होता. यावेळी विजयकुमार अजमेरा व लता अजमेरा यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त मंदिरातर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी दिनेश सेठी, विजयकुमार अजमेरा, संदीप ठोले, आनंद सेठी, हुकूमचंद चांदीवाल, विजय पापडीवाल, अरुण पाटणी, ज्योती चांदीवाल, सुचिता सेठी, निर्मला जालनापूरकर, पियुष पापडीवाल, अंजली पापडीवाल, निता सेठी, श्रीपाल पाटणी, अजयकुमार पाटणी, पारस पांडे, श्रेनीक कासलीवाल, शिरीष पाटणी, निवेदिता सेठी, सुनिता कासलीवाल, कुंकुमबाई पापडीवाल, निकीता पापडीवाल, माधुरी पापडीवाल, शोभाबाई पांडे, निलम पाटणी, सोनल कासलीवाल, अंजली पापडीवाल, नमन सेठी, किर्ती अजमेरा, संगीता सेठी, उषा कासलीवाल, कांचनबाई ठोले, शरद जालनापूरकर, पियुष कासलीवाल, दिनेश जैन यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोयगाव तालुक्यात 'वृक्षारोपण, खड्डा ओपण' बुलंद छावाची चौकशीची मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

बनोटी ते सोयगाव व सोयगाव ते उंडणगाव रस्त्यावर वृक्ष लागवड करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागामार्फत २०२२-२३ या वर्षात निविदा मागविण्यात आली होती. या कामाची तांत्रिक मान्यता दिली गेली होती. काम सुरू असल्याचे दाखवून वृक्ष लागवड न करता लागवड पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले. त्याची देयकेसुद्धा उचलण्यात आली. याबाबत बुलंद छावा मराठा युवा परिषद संघटनेने मार्च आणि एप्रिल महिन्यात सामाजिक वनीकरण अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. त्यावर सहाय्यक वनरक्षक २, सामाजिक वनीकरण विभाग यांना सामाजिक वनीकरण अधिकारी यांच्याकडून नियमानुसार सविस्तर चौकशी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचा आदेश होता. याबाबत सामाजिक वनीकरण विभागाच्या कार्यालयात संघटनेने चौकशी केली असता संबंधित कामाच्या छायाचित्र प्रती सादर कराव्यात. त्यामुळे प्रकरणाला चालना मिळेल, असे सांगण्यात आले. त्यावर संघटनेने काही छायाचित्रांच्या प्रती सामाजिक वनीकरण विभागाच्या कार्यालयात सादर केल्या. परंतु, त्यानंतरही कारवाई करण्यात आली नाही. या प्रकरणी कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे प्रदेश सचिव सुरेश वाकडे, सिल्लोड-सोयगाव तालुकाध्यक्ष विनोद बगळे, तालुका उपाध्यक्ष कृष्णा मोजे, तालुका कार्याध्यक्ष भगवान बगळे, दिलीप लोखंडे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# 'मिले ना मिले हम' म्हणत लोकसभेत पुन्हा भेटले; खा.कंगना-चिरागची जोडी आता लोकसभेत

**मुंबई (प्रतिनिधी)**-या लोकसभा निवडणुकीचे निकाल अनेकांना अनपेक्षित होते. एकीकडे सत्ताधारी भाजपाने दिलेला 'चारशेपार'चा नारा फोल ठरून त्यांना बहुमत गमवावे लागले, तर दुसरीकडे 'इंडिया'

आघाडीने दमदार पुनरागमन केले. याबरोबरच इतरही अनेक आश्चर्यकारक आणि धक्कादायक गोष्टी या निवडणुकीमध्ये घडल्या. अनेक बॉलीवूड स्टार्सही या निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. बॉलीवूड स्टार्सनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची ही काही पहिली वेळ नव्हती. मात्र, या निवडणुकीमध्ये कंगना रणौतच्या उमेदवारीची आणि विजयाचीही बरीच चर्चा झाली. मात्र, या लोकसभा निवडणुकीमधील कंगनाच्या

विजयाने एक अजबच योगायोग साध्य झाला आहे. एनडीएचा एक महत्त्वाचा आणि दीर्घकाळचा मित्रपक्ष असलेल्या लोक जनशक्ती पार्टीचे प्रमुख चिराग पासवान यांनी सुरुवातीला बॉलीवूडमध्ये आपले नशीब आजमावून पाहिले होते. तेव्हा



त्यांनी कंगना रणौतबरोबर पहिला चित्रपट केला होता. आता त्यांचं संसदेत पुनर्मिलन होत आहे. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चा रंगल्या आहेत.

# एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरीत 'नवस' प्रथम ! अ. भा. मराठी नाट्य संमेलनानिमित्त आयोजन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त राज्यभरात वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या. एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरीत बीड येथील प्रगती सेवाभावी संस्थेची 'नवस' एकांकिका पहिल्या क्रमांकाची मानकरी ठरली. सर्वोत्कृष्ट एकांकिकेसह 'नवस' ने सहा पारितोषिके पटकावली आहेत.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा घेण्यात आली. विभागनिहाय तीन फेऱ्यात स्पर्धा पार पडली. स्पर्धेची अंतिम फेरी मुंबईत बुधवारी, १२ रोजी झाली. यात बीड येथील प्रगती सेवाभावी संस्थेची 'नवस' एकांकिका पहिल्या पारितोषिकाची मानकरी ठरली. या एकांकिकेचे लेखन आणि दिग्दर्शन संतोष पैठणे या तरुण रंगकर्मीने केले. 'एका दाम्पत्याला मूल होत



नसते. त्यांना मूल होण्यासाठी 'त्या' पुरुषाची आई नवस बोलते. मूल जन्मल्यानंतर पाच दिवस त्याचे वडिलाने तोंड पाहू नये, असा नवस असतो. बरीच वर्षे मूल न झाल्यामुळे निराश असलेल्या बापाची घालमेल आणि नवसाची पूर्तता अशा पातळीवर कथानक घडते. नर्मविनोदी शैलीतून हा विषय मांडला आहे', असे दिग्दर्शक संतोष पैठणे याने सांगितले.

यापूर्वी संतोषने विविध स्पर्धेत अभिनयाची पारितोषिके पटकावली आहेत. या एकांकिकेसाठी पवन शिंदे, आकाश थोरात, अक्षय फुलझळके, लक्ष्मीकांत दोडके यांनी तांत्रिक सहाय केले. 'नवस' चा प्रयोग उल्लेखनीय ठरला आहे. भायखळा (मुंबई) येथील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी आणि ज्येष्ठ दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण अभिनेते सुबोध भावे, मुक्ता बर्वे, दिग्दर्शक सतीश राजवाडे, विश्वास सोहोनी आणि अनिल बांदिवडेकर यांनी केले. पहिल्या फेरीत ४५० एकांकिकांच्या प्रवेशिका होत्या. अंतिम फेरीत नऊ एकांकिकांमध्ये चुरस होती. त्यात 'नवस'ने बाजी मारत सर्वांचे लक्ष वेधले.

**सहा पारितोषिके!**

अंतिम फेरीत 'नवस' एकांकिकेने सहा पारितोषिके पटकावली आहेत. सर्वोत्कृष्ट एकांकिका, दिग्दर्शन प्रथम पारितोषिक संतोष पैठणे, लेखन उत्तेजनार्थ पारितोषिक संतोष पैठणे, स्त्री अभिनय उत्कृष्ट पारितोषिक अंकुर तांगडे, स्त्री अभिनय पारितोषिक उत्तेजनार्थ मानसी जाधव, पुरुष अभिनय पारितोषिक प्रथम विठ्ठल जोगदंड अशी पारितोषिके मिळाली आहेत. आशय आणि अभिनय या पातळीवर एकांकिका परीक्षक आणि प्रेक्षकांना विशेष भावली.

# मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन रस्त्यावर भाजी विक्रेतांचे अतिक्रमण काढले

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

महानगरपालिका अतिक्रमण पथक मार्फत आज जय भवानी नगर मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन रस्त्यास अडथडा ठरणारे एकूण १५ हातगाडीया हटविण्यात आल्या. सदरील रस्त्यावर जाताना भाजी विक्रेतांचे अतिक्रमणामुळे अडथळा निर्माण होत आहे अशी तक्रार स्थानिक नागरिकांनी आयुक्त यांच्याकडे वेळोवेळी केली होती.

त्या अनुषंगाने आज कारवाई करण्यात आली. एकूण १५ अतिक्रमण धारकाविरुद्ध कारवाई करताना चार हातगाळे, लोखंडी काउंटर जप्त करण्यात आले. सदर भाजी विक्रेत्यामुळे या भागात नेहमीच लहान-मोठे अपघात होत आहे आणि रेल्वे स्टेशनला जाताना प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याने अनेक लोकांना रेल्वे स्टेशनला जाताना गाडी धरताना पण याचा त्रास जाणवत होता. याबाबत या लोकांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या होत्या. याशिवाय सदरील रस्त्यावर अनधिकृत पार्किंग करणारे



वाहनधारकांविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा वाहतूक पोलिसचे अतिरिक्त आयुक्त यांनी दिला आहे. या रस्त्यावर कारवाई करून पंधरा बाय तीन चे दहा, दहा बाय दहा चे पाच शेड काढले व येथील रस्त्यावरील सर्व अतिक्रमण काढन्यात आले. सदरील कारवाई प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त संतोष वाहुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उप आयुक्त अतिक्रमण सविता सोनवणे, पदनिर्देशित अधिकारी अर्जुन गिराम यांच्या पथकाने पार पाडली.

# माजी सैनिकांच्या विविध मागण्यांप्रश्नी त्रिदल सैनिक सेवा संघाचे नगर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयास निवेदन

**श्रीरामपूर / प्रतिनिधी**

गेली ६-७ वर्षे व देशात दुर्धर आजार कोवीड -१९ नंतर सैनिक मेळावा न घेण्यात आल्याने श्रीरामपूर तालुक्यातील माजी सैनिकांना राज्य ,केंद्र तसेच सैनिक कार्यालयाच्या माध्यमातून शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे. हे काम जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे आहे.श्रीरामपूर तालुका हा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत मोठा व तिन्ही दलाचे मोठ्या संख्येने माजी सैनिक असलेल्या तालुक्यातील एक प्रमुख तालुका आहे , तालुक्यामध्ये अनेक ज्येष्ठ सैनिक, विधवा पत्नी, वीर पत्नी, वीर माता ,अपंग सैनिक असे अनेक सैनिक आहेत, जे सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर येथे जावू शकत नाहीत, त्यामुळे सैनिकांना मिळणाऱ्या सुविधा आणी माहिती प्राप्त होत नाही, उदा, विधवांना प्रतिवर्ष मिळणारी आर्थिक मदत, वैद्यकीय मदत व मदतीची माहिती, पाल्यांना मिळणारी शैक्षणिक व आर्थिक मदत, शालेय शिष्यवृत्ती, पाल्य भरती प्रक्रिया, अपंग सैनिकांना मिळणाऱ्या सुविधा, मुलींच्या विवाहासाठी मिळणारा राज्य सरकार आणि केंद्र सरकारचा निधी,सीएसडी कॅन्टीन सुविधा अशा अनेक प्रकारच्या



समस्यांचे निवेदन त्रिदल सैनिक सेवा संघाच्या वतीने मा.चित्रसेन गडांकुश (सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अहमदनगर) यांना देण्यात आले आहे.

तसेच माजी सैनिकांच्या सुविधे प्रकरणी शासनाकडून मिळत असलेल्या सुविधांपासुन त्यांना वंचित रहावे लागणार नाही याकरिता लवकरच मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.

या निवेदनावर त्रिदल सैनिक सेवा संघाचे नगर उत्तर विभागाचे उपाध्यक्ष मेजर कृष्णा सरदार ,तालुका अध्यक्ष संग्राम जीत यादव , बाळासाहेब बनकर ,भगीरथ पवार ,सुनील गवळी ,मंगेश यादव, अमित देशमुख , संतोष देवराय, बाळासाहेब भागडे ,रवींद्र कुलकर्णी , विलास खर्डे, सोमनाथ ताके, असलम शेख ,रामदास वाणी ,अशोक कायगुडे, कैलास खंडागळे ,अनिल काळे, सुधाकर हरदास , चांगदेव धाकतोडे, राजेंद्र कांदे इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहे.

सह्याद्रीचा राखणदार



# जल जीवन मिशन ने गावातील रस्ते केले खराब;जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील जवराबोडी येथील रस्ते केंद्र सरकारच्या जल जीवन योजने अंतर्गत ठेकेदारांनी खोदलेल्या रस्त्यांमुळे गावातील नागरिकांची ट्रॅक्टर बंडी बैल नेण्यासाठी अडथळा निर्माण झाला असून, सिमेंट कॉंक्रीटचे नुकतेच तयार केलेले रोड फोडल्यामुळे व त्या रोडवरील तीन फूट खोल नाल्या मातीने बुजवल्यामुळे जाणे येणे करण्यासाठी नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

गावात केंद्र सरकारच्या जल जीवन मिशन अंतर्गत हर घर जल ही योजना राबविण्यासाठी व गावातील रस्त्याने पाण्याची पाईपलाईन टाकण्यासाठी ठेकेदाराने गावातील सिमेंट रोड फोडून तीन फूट खोल नाल्या तयार केल्या व पाईपलाईन टाकल्या परंतु त्या नाल्या बुजवताना सिमेंट कॉंक्रीट चा वापर न करता मातीचा वापर करण्यात आला. त्यामुळे आलेल्या पावसाने रोडवर दलदल निर्माण झाले .रोडवर ठिकठिकाणी पाण्याचे डबके तयार झाले. त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून वर्दळ करणे कठीण झाले आहे. आता नेमकाच पावसाळा सुरू झाला असून या रस्त्यावर भरलेल्या डबक्यामुळे भविष्यात आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. तसेच हे गाव दाट वस्तीचे असल्यामुळे येथील रस्ते अरुंद आहेत. रस्त्याने फक्त सिंगल ट्रॅक्टर किंवा सिंगल बैलबंडी जाऊ शकते अशातच रोड फोडून तीन फूट खोल नाल्या केल्यामुळे व त्या नाल्या मातीने बुजवल्यामुळे या रोडवर ट्रॅक्टर, बैलबंडी किंवा रिकामे बैल पावसाळ्यात या नाल्यांमध्ये फसून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाळा सुरू होऊन सुद्धा गावात जलजीवन मिशनचे काम ७० टक्के पूर्ण झाले आहे. तर बरेच कामे ही अपूर्ण आहेत. त्यामुळे जल जीवन मिशनच्या ठेकेदाराने त्वरित या रस्त्यावर सिमेंट कॉंक्रीट टाकून रस्ते पूर्ण करावे, अशी मागणी गावातील नागरिकांनी केली आहे.





# नेचर फाउंडेशन तर्फे अमोल देवगिरकर यांचा सत्कार

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर येथील गुरुदेव संस्कृती सभागृह वडाळा (पैकू) येते सत्कार समारंभ व मार्गदर्शन कार्यक्रम नुकताच पार पडला. या कार्यक्रमात शंकरपूर येथील माई फाउंडेशनचे अमोल देवगिरकर यांचा उत्कृष्ट समाजसेवा करीत असल्याबद्दल शाल, श्रीफळ व पेरूच्या झाडाची कलम भेट देऊन नेचर फाउंडेशन च्या वतीने सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमाचे उद्घाटन चिमूर क्षेत्राचे आमदार कीर्तीकुमार उर्फ बंटीभाऊ भांगडिया यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाला मार्गदर्शन ऍड. राहुल वासनिक, उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर, माननीय विशाल मसराम फरगुशन पुणे, माननीय साहिल लोणबले, फरगुशन महाविद्यालय पुणे, माननीय वनश्री जीवतोडे, शासकीय विधी महाविद्यालय मुंबई यांनी केले.

या कार्यक्रमात सत्कारमूर्ती कुमारी पूजा नामदेव चापले अजीम प्रेमजी विद्यापीठ बंगळुरू तसेच कुमारी समीक्षा शंकर नन्नावरे डेव्हलपमेंट स्टुडन्ट आयआयटी हैदराबाद यांचाही सत्कार करण्यात आला. माई फाउंडेशनचे अमोल देवगिरीकर हे परिसरातील बेवारस मृत प्राण्यांचा सन्मानाने अंत्यसंस्कार करतात. तसेच बस स्थानक परिसरात प्रवाशांसाठी थंड पाण्याची व्यवस्था करणे, इत्यादी मोलाची समाजसेवा करीत असल्याने नेचर फाउंडेशन तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला असून, या सत्कारामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# विभागीय आयुक्तालयाच्या इमारतीवर चढून मराठा आंदोलकांचे आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठा समाजाला सरसकट कुणबी जातप्रमाणपत्र मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे सहा दिवसांपासून उपोषण करत आहेत. त्यांच्या भावना राज्य सरकारपर्यंत पोहोचाव्यात या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या पाच कार्यकर्त्यांनी गुरुवारी दुपारी साडेचारच्या सुमारास विभागीय आयुक्त कार्यालयाच्या इमारतीवर चढून घोषणाबाजी केली. यानंतर प्रभारी विभागीय आयुक्तांना निवेदन देण्यात आले.



मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. मात्र, कुणबी जातप्रमाणपत्रांचे सरसकट वाटप अद्यापही सुरु करण्यात आलेले नाही. त्यासाठी गेल्या सहा दिवसांपासून मनोज जरांगे पाटील हे आंतरवाली सराटी गावात आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांची प्रकृती वरचेवर खालवत आहे. त्यामुळे त्यांच्या जिवीताला धोका निर्माण होऊ शकतो. महाराष्ट्रातील तमाम मराठा बांधवांच्या भावना त्यांच्याशी जोडल्या गेल्यामुळे मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांबाबत व मराठा समाजाच्या भावना राज्य शासनाला कळवाव्यात अशी मागणी करत सकल मराठा समाजाच्या पाच कार्यकर्त्यांनी दुपारी साडेचारच्या सुमारास विभागीय आयुक्त कार्यालयाच्या इमारतीवर चढून घोषणाबाजी केली. यावेळी सिटीचौक पोलिसांनी धाव घेत आंदोलकांना इमारतीवरुन खाली उतरवले. प्रभारी विभागीय आयुक्त जगदीश मिनीयार यांनी कार्यकर्त्यांचे निवेदन स्वीकारले.

# मोदी पहिल्यांदा परदेश दौऱ्यावर जी-७ परिषदेमध्ये होणार सहभागी

**नयी दिल्ली (प्रतिनिधी)**-लोकसभा निवडणुकीत एनडीएला बहुमत मिळाल्यानंतर नरेंद्र मोदींनी जून रोजी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. त्यावेळी एनडीएमधील काही नेत्यांनीही मंत्रि? पदाची शपथ घेतली. त्यानंतर एनडीए सरकारच्या मंत्रिमंडळाची पहिली बैठक पार पहली. या बैठकीत काही महत्याने निर्णय घेण्यात आले. यानंतर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी परदेश दौन्यायर रवाना होणार आहेत. तिसऱ्यांदा पंतप्रधानपदानी सूत्रे हाती घेतल्यानंतर नरेंद्र मोदी यांना हा पहिलान परदेश दौरा असून से इटस्यैत्या जाणार आहेत. इटलीमध्ये जी ७ शिखर परिषदेने आयोजन करण्यात आलेले असून वा शिखर परिषदेमध्ये ते सहभागी होणार



आहेत. इटलीमध्ये १४ ते १५ जून या कालावधीत जी ७ शिखर परिषद पार पडणार आहे. या परिषदेला अमेरिकेने राष्ट्राध्यक्ष जो वादेन, शान्सने अध्यक्ष इमॅन्युएल मैक्रॉन, जपानचे पंतप्रधान पुमियो किशिया, कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन टूडो, भारताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह आदी महत्वाचे नेते या शिखर परिषदेला उपस्थित असणार आहेत. या शिखर परिषदेमध्ये जागतिक पातळीवरील काही महत्याच्या विषयांवर चर्चा होणार आहे. दरम्यान, परराष्ट्र सनिय विनय मोहन क्याश यांनी पंतप्रधान

नरेंद्र मोदी यांच्या इटलीच्या दौ-याविषयी बोलताना सांगितलं की, 'इटलीच्या पंतप्रधान जॉर्जया बेलोनी यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या १४ जून रोजी होणान्या ५० व्या जी ७ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी इटलीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यासाठी १३ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे इटलीसाठी स्वाना होणार आहेत. सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर हा त्यांचा पहिला परदेश दौरा असेल, असं त्यांनी सांगितल इटलीत होणाऱ्या जी ७ शिखर परिषदेत अमेरिका, फ्रान्स, इटली, जर्मनी, कॅनडा, जपान, ब्रिटन या देशाच्या प्रमुख नेत्यांना सहभाग असणार आहे. याबरोबर आदी गतिक

विषयांवरील मुद्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. दम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर या दौ-यावेळी एक उच्चस्तरीय शिष्टमंडली असण्याची शक्यता आहे. यामध्ये परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, परराष्ट्र सनिय विनय क्याश यांच्यासह आदीचा सहभाग असत्यानी शक्यता आहे. वा इटलीच्या दौ-यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांच्यासह अनेक देशाच्या प्रमुखांबरोबर महत्वाच्या विषयांवर चर्चा करण्यानी शक्यता

# अल्तमश शेखचे नीट परीक्षेत सुयश

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील वाळकेश्वर (शहागड) येथील प्रसिद्ध सोहेल हॉस्पिटलचे संचालक डॉ. चांद शेख यांचे कनिष्ठ चिरंजीव तथा गेवराई येथील प्रसिद्ध गेवराई हॉस्पिटलचे संचालक डॉ. सोहेल शेख यांचे कनिष्ठ बंधू अल्तमश शेख याने चालू वर्षी (सन २०२४ मध्ये) झालेल्या वैद्यकीय प्रवेश पूर्व छएएढ परीक्षेत ७२० पैकी ६१६ गुण प्राप्त करून यश मिळवल्याबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. अल्तमश शेख यांचे प्राथमिक शिक्षण वाळकेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, माध्यमिक शिक्षण शहागडच्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत झाले असून उच्च माध्यमिक शिक्षण जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रामपुरी तालुका गेवराई



येथे झाले आहे. त्यानंतर त्यांनी लातूर येथील शाहू कॉलेजमध्ये पुढील शिक्षण घेतले. या यशाबद्दल लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष तथा शासकीय कंत्राटदार अय्युब खान पठाण यांनी अल्तमश शेख यांचे अभिनंदन केले आहे.

# काही विद्यार्थ्यांच्या प्रश्नासाठी देशातील विद्यार्थ्यांना विठीस का धरतात?-आयुब पठाण

## नीट परीक्षेत घोळ घालणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांवर गुन्हे दाखल करून त्यांना शैक्षणिक अपात्र ठरवा!

**बीड *। प्रतिनिधी**

इसवी सन २०२४ मध्ये नीट परीक्षेत महाराष्ट्र व्यतिरिक्त अन्य राज्यांमध्ये परीक्षा घेणाऱ्या सदस्यांना मॅनेज करून मोठा घोळ घालण्यात आला आहे. यामुळे कष्ट करून मार्क घेणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय झाला आहे. हा प्रकार झाला आहे. पैसा असणाऱ्या बलाढ्य शक्तीनी हा प्रकार केला असून ज्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना एक सारखे गुण आणि ग्रेसमार्क देण्यात आले आहेत त्या परीक्षा केंद्रावरील नीट ची पुनपरीक्षा घेऊन देशातील गोरगरीब विद्यार्थ्यांना न्याय द्यावा



अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा लोकशाही पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष आयुब पठाण यांनी केली आहे.

देशात हफ्तेखोरी, लाचखोरी मोठ्या प्रमाणात बळवली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना सुद्धा विठीस धरण्याचे काम प्रशासनाकडून होत असून लाखोंची संपत्ती असणाऱ्या शक्तीने देशातील विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणाऱ्या नीट परीक्षेत मोठा घोळ केला आहे. यामुळे गोरगरीब आणि कष्टकरी विद्यार्थ्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. महाराष्ट्र व्यतिरिक्त अन्य राज्यांमध्ये नीट परीक्षेचा पेपर फोडून मोठ्या प्रमाणात गुणांची गोळाबेरीज करण्यात आली आहे. अपेक्षित नसणारे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त झाले असल्याने देशातील गोरगरीब आणि कष्टकरी विद्यार्थी हदबल झाले आहेत. ज्या केंद्रामध्ये असा प्रकार झाला आहे त्या केंद्रातील परीक्षा पुन्हा घेण्यात येऊन देशातील डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी आयुब पठाण यांनी केली आहे.

## जितेंद्र अग्रवाल यांनी जालन्याचा डंका अटकेपार पोहोचवला!

# नामांकित व खडतर अशी ८७ की.मी.ची स्पर्धा जितेंद्र अग्रवाल यांनी केवळ ११ तास ४२ मिनिटात पूर्ण

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

जागतिक स्तरावरील नामांकित व खडतर असलेल्या कॉम्रेड मॅरेथॉन ही ८७ किलोमीटरची स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत नुकतीच पार पडली. यात जालन्याचे जितेंद्र अग्रवाल यांनी सहभाग नोंदवला याबद्दल फॅब रनर ग्रुपने त्यांचा पांजरापोळच्या मैदानावर सत्कार केला. सत्कारला उत्तर देताना अग्रवाल म्हणाले, ही स्पर्धा पूर्ण करणे म्हणजे ईश्वराची कृपा असावी लागते आणि मित्राच्या शुभेच्छाही पाहिजेत. अतिशय खडतर अशी ही स्पर्धा त्यांनी ११ तास ४२ मिनिटात पूर्ण केली व जालन्याचा डंका अटकेपार पोहोचवला. या स्पर्धेत सहभागी होणारे जालन्याचे ते पहिलेच यशस्वी धावपटू आहेत. यावेळी फॅब ग्रुपचे अशोक राठी, अर्जुन



जगताप, प्रशांत भाले, डॉ. दिलीप दिवटे, संजय अंपाळकर, किसन जाधव, धनसिंह सूर्यवंशी, ॲड.ईश्वर बिलोरे, राम हलनोर, काशिनाथ मोरे, श्रीराम सर, दिनेश अंधेवार, अजय सिंगला, भास्कर पवार, मनोज कुमकर, धर्मेश उजवणे, राजू सैनी, डॉ. सतीश शेकडे, केशर सिंग राजपूत, कैलास जाधव, विष्णू पाटेकर, बलराज शिराळे, अनिल मालपाणी, मिलिंद खेरुडकर, संजय रुणवाल, संजय शेजुळ, हितेंद्र त्रिवेदी, नागेश मापारी, मिलिंद वासनिक, दशरथ पडूळ, विजय लोळगे, संदीप ढगे व इतर क्रीडा प्रेमी उपस्थित होते.

# अजितदादांना सोबत घेतल्याने कोणतंही नुकसान नाही-चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)**-४०० पारचा नारा देणाऱ्या भाजपला केवळ २४० जागा मिळाल्या, याचं कारण म्हणजे भाजप नेत्यांचा अति आत्मविश्वास असल्याची टीका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित ऑर्गनायझर या मासिकात करण्यात आलीय. भाजप आणि शिंदेंकडे आवश्यक बहुमत असूनही अजित पवारांशी हातमिळवणी का केली, असा सवालही यामधून करण्यात आला. यासंदर्भात भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली. अजित पवारांमुळे आमचे मत वाढली, असा दावाच त्यांनी केला. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, अजित पवारांना घेऊन भाजपचं कोणतही नुकसान झालेलं नाही. याउलट २०१९ च्या तुलनेत भाजपची मतं वाढली आहेत, असे स्पष्टीकरण भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. मात्र, २०१९ च्या तुलनेत जागा कमी झाल्या हे सत्य आहे, असेही त्यांनी पुढे सांगितले. दरम्यान, महाविकास आघाडीतील लोक हरल्यावर ईव्हीएमला दोष देतात. मात्र, जिंकलेले असतील तिथे ईव्हीएमवर संशय का घेत नाहीत, असा सवाल बावनकुळे यांनी उपस्थित केला.राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत मोदीजींना पाठिंबा दिला होता. इतर निवडणुकीबाबत आमची त्यांची चर्चा बाकी आहे, चर्चा झाल्यावर यातून मार्ग निघेल, असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.सुनेत्रा पवारांना दिलेली जागा ही राष्ट्रवादीची जागा आहे. महायुतीमधून त्यांना सगळ्यांचं समर्थन आहे. मात्र, महायुतीमधून हा नाही गेला, तो नाही गेला याला काही अर्थ नाही असेही बावनकुळे यांनी म्हटले.लोकसभा निवडणुकीत भाजप महायुतीला केवळ १७ जागांवर विजय मिळाला आहे. विशेष म्हणजे भाजपने महायुतीमध्ये अजित पवारांचाही समावेश करुन घेतला होता.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .